# घोरकष्टोद्धरण स्तोत्र : अल्प परिचय

श्री. वासुदेव वामन बापट गुरुजी

परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमत् वासुदेवानन्द सरस्वती स्वामी महाराज हे लोकोत्तर अधिकारी महापुरुष असून दत्तसंप्रदायातील प्रत्येक भक्ताकरिता वरेण्य आहेत. श्रीमत् आद्य शंकराचार्यांप्रमाणेच संपूर्ण भारत खंडात पदभ्रमण करीत वेदप्रणीत आचार-विचार व धर्माचा प्रसार त्यांनी आयुष्यभर केला आणि जनमानसाशी संवाद साधत श्रीदत्तभक्तीचा प्रचार केला.

सर्व संत हे स्वभावत:च परम कारुणिक असतात. म्हणूनच परिस्थितीमुळे विवश झालेल्या आणि घोर कष्ट उपसणाऱ्या, संकटांशी सामना करणाऱ्या आपल्या भक्तांचे दु:ख स्वामींना पाहवले नाही. त्यांचे हे दु:ख व कष्ट निवारण करण्यासाठी त्यांनी या 'घोरकष्टोद्धरण' स्तोत्राची रचना केली.

**।। (अ) घोरकष्टोद्धरण स्तोत्र ।।**

श्रीपाद श्रीवल्लभ त्वं सदैव ।
श्रीदत्तास्मान्पाहि देवाधिदेव ।।
भावग्राह्य क्लेशहारिन्सुकीर्ते ।
घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।।१।।
त्वं नो माता त्वं पिताऽऽप्तोऽधिपस्त्वं ।
त्राता योगक्षेमकृत्सद्गुरुस्त्वम् ।।
त्वं सर्वस्वं नोऽ प्रभो विश्वमूर्ते ।
घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।।२।।
पापं तापं व्याधिमाधिं च दैन्यं ।
भीतिं क्लेशं त्वं हराऽ शुत्वदन्यम् ।।
त्रातारं नो वीक्ष ईशास्तजूर्ते ।
घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।।३।।
नान्यस्त्राता नापि दाता न भर्ता ।
त्वत्तो देव त्वं शरण्योऽ कहर्ता ।।
कुर्वत्रियानुग्रहं पूर्णराते ।
घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।।४।।
धर्मे प्रीतिं सन्मतिं देवभक्तिम् ।
सत्संगाप्तिं देहि भुक्तिंच मुक्तिं ।।
भावासक्तिं चाखिलानन्दमूर्ते ।
घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।।५।।
श्लोकपंचकमेतद्यो लोकमंगलवर्धनम् ।
प्रपठेन्नियतो भक्त्या स श्री दत्तप्रियो भवेत् ।।६।।

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामिविरचितं अघोरकष्टोद्धरण स्तोत्रं संपूर्णम् ।।

**स्तोत्राचे प्रयोजन:** हे स्तोत्र, श्लोकसंख्येने लहान म्हणजे केवळ सहा श्लोकांचं असूनही अत्यंत शक्तिशाली आणि बलवान आहे. वरवर पाहता साध्या दिसणाऱ्या या स्तोत्रात प्रचंड अर्थ आणि ऊर्जा सामावलेली आहे. ज्याप्रमाणे रामरक्षा हे सबंध स्तोत्र हाच एक मंत्र आहे, त्याप्रमाणेच हे घोरकष्टोद्धरण स्तोत्र हा सुद्धा स्तोत्ररूपी महामंत्रच आहे. रामरक्षेप्रमाणेच या स्तोत्रातील प्रत्येक श्लोक हा एक मंत्र असून, काही विशिष्ट अशा प्रापंचिक आणि पारमार्थिक इच्छांची परिपूर्ती करून देणारा आहे.

यातील प्रत्येक श्लोकात सामावलेला शक्तीचा स्रोत निराळा आहे. सूर्यप्रकाशात सात निरनिराळे रंग असतात आणि या प्रत्येक रंगाची शक्ती निरनिराळी असते. प्रत्येक रंगातील विशिष्ट शक्तीच्या स्रोतामुळे प्रत्येक रंग कशाच्या तरी कमतरतेवरचा एक उपाय असतो. प्रत्येक रंगाच्या अंतर्गत शक्तीच्या या वैविध्यामुळे कधी कोणाला एक रंग आवडतो, तर दुसऱ्याला दुसरा रंग आवडतो. ज्याच्या त्याच्या स्वभाववैशिष्ट्यानुसार तो रंग त्याला भावत असतो. यापैकी कुठल्या रंगाची शक्ती कोणाला भावेल आणि योग्य होईल, हे जाणकाराला समजतं. आधुनिक विज्ञानातील स्ट्रोबोस्कोप यंत्राच्या माध्यमातूनही आता विशिष्ट रंगाची उपयोगिता समजू शकते आणि सुचविता येऊ शकते.

गायत्री मंत्राचं वैयक्तिक पठण आणि सामुदायिकरीत्या केलेलं एकत्रित पठण, यातून निर्माण

होणाऱ्या शक्तिलहरींवर किर्लीन फोटोतंत्रांद्वारे काही संशोधन करण्यात आले आहे. त्याप्रमाणे या स्तोत्रातील मन्त्राच्या सामर्थ्याबाबत मात्र, आधुनिक वैज्ञानिक उपकरणाद्वारे कोणी संशोधन केल्याचे दिसून येत नाही. भविष्यात असे संशोधन कोणी केल्यास ते निष्कर्ष सुद्धा समाजापुढे येऊ शकतील. एकत्रतेची शक्ती फार मोठी असते. म्हणूनच अशा या सामर्थ्यशाली स्तोत्रांचे सामुदायिक पठण वैयक्तिक पठणाच्या तुलनेने अतिशय उत्तम ठरते; कारण त्यात या सर्व शक्तींचा समन्वय साधला जातो.

**स्तोत्राची पूर्वपीठिका –** श्री थोरल्या स्वामी महाराजांनी एकविसावा चातुर्मास श्री क्षेत्र कुरवपूर येथे केला होता. कोल्हापूरचे श्री. शेषो कारदगीकर हे स्वामी महाराजांचे भक्त. त्यांची स्वामी महाराजांवर आत्यंतिक श्रद्धा होती. ते संततीहीनता आणि संपत्तीहीनता अशा दोन संकटांनी त्रस्त होते. यतिधर्माप्रमाणे स्वामी महाराज एका गावातून दुसरीकडे, असं सतत भ्रमण करीत असत.

एकविसाव्या चातुर्मासावेळी स्वामी महाराज कुरवपूरला आले असता, या शेषो कारदगीकरांनी आपल्या सुविद्य पत्नीसह त्यांची भेट घेतली आणि आपल्या व्यथांचे अत्यंत करुण स्वरात निवेदन केले. स्वामी महाराजांनी त्यांच्या पत्नीच्या ओटीत श्रीफळ आणि धान्य दिले आणि आशीर्वाद दिला, 'जा! तुझ्या दोन्हीही मनोकामना पूर्ण होतील.' त्याप्रमाणे पुढे त्यांना एक मुलगा आणि एक मुलगी अशी अपत्ये झाली आणि त्यांचे सर्व कर्जही फिटले.

मनुष्य स्वभावत: थोडा जरी प्रामाणिक असला, तरी तो आत्मशोधन करतोच आणि मग त्याला समजते की, हे काही फक्त आपल्या पुण्याचे किंवा कर्माचे फळ नाही, तर इथे कुठलीतरी वेगळी शक्ती कार्यान्वित झालेली आहे. आपल्याप्रमाणेच सर्व लोकांचे कष्ट दूर व्हावेत आणि सर्व लोक सुखी राहावेत, म्हणून एके दिवशी श्री. शेषो कारदगीकर यांनी श्री स्वामी महाराजांना अशी प्रार्थना केली की, 'माझ्या तर इच्छा पूर्ण झाल्या. पण आपल्याकडे असे लाखो लोक आहेत, जे अशा घोर संकटांशी सामना करीत आहेत. आपल्या रोगांचे परिमार्जन कोणत्या औषधाने होईल हे त्यांना अज्ञानामुळे उमजत नाही. याकरिता माझ्याप्रमाणेच सर्व लोकांचे कष्ट निवारण व्हावेत, म्हणून श्रीपाद श्रीवल्लभांचा धावा करता येईल, असे एखादे स्तोत्र सर्वांसाठी करून द्यावे.'

श्री स्वामी महाराजांनी त्यांची विनंती मान्य केली आणि त्याच दिवशी या स्तोत्राची रचना करून त्याला सांगितले की, 'या स्तोत्रात माझी सर्व शक्ती, सर्व सामर्थ्य प्रोक्षित केले आहे. हे स्तोत्र सद्गुरूंच्या आज्ञेने जे जे पठण करतील, त्यांना त्यांचे इच्छित लाभ कमी-अधिक काळात निश्चित मिळतील. तसेच त्याहूनही श्रेष्ठ अशी अद्वैत भक्ती प्राप्त होईल.'

**अद्वैत भक्ती –** या अद्वैत भक्तीचा मतितार्थ असा की, केवळ प्रापंचिक गरजा भागून या भवसागरातून पार होता येत नाही, त्याकरिता ज्ञान आणि भक्ती या दोन्हीही गोष्टी आवश्यक आहेत. या दोन्ही एकमेकांना पूरक आहेत. ज्ञानाशिवाय भक्ती नाही व भक्तीशिवाय ज्ञान नाही. आत्मज्ञान झाले की, भक्ती आपोआप उत्पन्न होते किंवा अतिउत्तम भक्ती घडली की, ज्ञानही प्राप्त होते.

आज समाजात कित्येक लोक असे आहेत की, त्यांची अवस्था ज्ञान नाही आणि भक्तीही नाही अशी असते. काही ठिकाणी भक्ती असते पण ती खोटी असते आणि ज्ञान असते ते अर्धवट असते. अशी गत हे स्तोत्र म्हणणाऱ्याची होणार नाही, असं आश्वासन श्रीस्वामी महाराजांनी स्तोत्राच्या शेवटी दिले आहे. 'तो एवढा उत्तम भक्त होईल की त्याचे व देवाचे एकमेकांवर निस्सीम प्रेम असेल,' असे शेवटच्या श्लोकात त्यांनी सांगितले आहे. देवभक्तांच्या प्रेमाच्या अशा अनेक कथा आपल्या संतवाङ्मयात आहेत.

**जगत्कल्याणाचा हेतू –** स्वामी महाराज स्वत:च्या देहाबाबत उदासीन असले, तरी त्यांच्या भक्तांच्या दु:खाबाबत उदासीन नव्हते. आपल्या भक्तांची तसेच ज्यांची श्रद्धा नाही त्यांची सुद्धा, दु:खे दूर होऊन ते सन्मार्गाला कसे लागतील, याकरिताच त्यांनी आपले पुढील आयुष्य वेचले.

संतांच्या या क्रियाकलापांमागे मुख्यत: कारुण्य असते. इथे सुद्धा या स्तोत्राच्या निर्मितीमागे प्रेरणा कारुण्यानेच दिली. हे कारुण्य सद्गुरु आणि शिष्य या दोघांच्याही मनात उदित झाले. भक्ताची आपल्या सद्गुरूंच्या ठायी पूर्ण शरणागती होती, नम्रता होती आणि त्याचा हेतूही अतिशय शुद्ध होता. मागताना त्याने समाजासाठीच वरदान मागितले, त्यामुळे तत्काळ या स्तोत्राची रचना झाली.

सद्गुरुतत्त्वही याच प्रकारचे असते की, जिथे केवळ कारुण्य वसत असते. प्रशस्तपादभाष्यात कारुण्याचे लक्षण असे सांगितले आहे-

**स्वार्थमनपेक्ष्य परदु:खप्रहाणेच्छा हि कारुण्यम्।**

कुठलाही स्वार्थ न ठेवता परदु:ख दूर करण्याची इच्छा म्हणजेच कारुण्य. सद्गुरुतत्त्वाला मिळवायचे असे काही

शिल्लकच नसते. जे धन मिळवलेले असते, ते म्हणजे पारमार्थिक धन; ते वाटण्यासाठीच ज्यांची निर्मिती असते ते म्हणजे सद्‌गुरुतत्त्व ! येणाऱ्या प्रत्येकाचे खरे भले झाले पाहिजे आणि तो भवसागरातून पार झाला पाहिजे, या एकमात्र उद्देशाने सद्‌गुरुतत्त्व कार्यरत होत असते. येणारा भक्त हा रोज काही ना काही पाऊल पुढे सरकला पाहिजे, यासाठीच यज्ञ, नामजप वगैरे उपक्रम सद्‌गुरुतत्त्वाच्या प्रेरणेने राबवले जातात.

**दुष्टचक्रातून सुटकेचा मार्ग –** समाजामध्ये कित्येक लोक भूत, प्रेत, पिशाच्च अशा नीच योनीतील लोकांच्या तडाख्यात सापडून काही गोष्टींच्या नादी लागलेले असतात. तेही सर्व एक प्रकारचे भक्त असतात. पण वाट चुकलेले असतात. अशा प्रकारे मार्ग शोधणारे भक्त जीवनात मोठ्या संकटात सापडलेले असतात. या चक्रातून बाहेर कसे पडावे, ते त्यांना कळत नसते, त्या सगळ्यांना योग्य दिशा दाखवण्याचे काम हे स्तोत्र करू शकते. त्यांनी जर नि:संशयपणे तो मार्ग सोडून या स्तोत्राचे पठण केले तर त्याच्या पूर्वदुष्कर्मांचा नाश होऊन ते दु:ख दूर होऊ शकते. योग्य मार्ग न मिळणे हा सुद्धा दुष्कर्मांच्याच फळाचा एक परिणाम असतो. प्रत्येकाला प्रारब्ध भोगचक्रातून वर काढण्यासाठीच हे स्तोत्र निर्माण झाले. या स्तोत्राची निर्मिती केवळ श्री. शेषो कारदगीकर या एका भक्तासाठी नव्हती.

आपल्याच प्रारब्धभोगाच्या चक्रात फिरत राहिलेल्या अशा सर्व स्तरावरच्या आपल्या भक्तांना त्यांच्या त्या अवस्थेतून वर काढून चांगले जीवन प्रदान करण्यासाठी व भक्तिमार्गाला किंवा योगमार्गाला लावून उन्नतावस्थेला नेण्यासाठी स्वामी महाराज सतत प्रयत्नशील होते, 'जयाचे ऐहिक धड नाही। तयांचे परत्र पुससी काई।' असे कित्येक लोक समाजात त्यांच्या अवतीभोवती होते. स्वामी महाराजांनी अशा लोकांसाठी, काही ना काही तरी मार्गदर्शन करून, त्यांचे ऐहिक सुधारून परत्रासाठी त्यांना मार्गस्थ केले.

माता ज्याप्रमाणे मुलाचा घाम आपल्या शालूने सुद्धा पुसायला कमी करत नाही, त्याप्रमाणे सद्‌गुरुमाऊलीही मातेच्या वत्सलेतेने सर्व घाण काढून आपला उद्धार करण्यास तयार असते. ही करुणेची किमया असते. यामुळेच या स्तोत्राची रचना झाली.

**घोर कष्टातून उद्धाराचा मार्ग –** कल्पना करूया की एक मनुष्य अंधाऱ्या रात्री अत्यंत दूर अशा एखाद्या देशात, जनशून्य प्रांतात किंवा एखाद्या जंगलाच्या मधोमध दीर्घकाळ चालत आहे. कुठे जायचे, कसे जायचे याचा पत्ता माहीत नाही. सगळीकडे गुडुप अंधाराचे साम्राज्य आहे; हिंस्र श्वापदांचे आवाज ऐकू येत आहेत. कोणत्या दिशेने जावे त्याला समजत नाही. काय करावे ते सुचत नाही. चालता चालता तो अत्यंत थकला आहे आणि आता हताश होऊन, जीवनाची आशा सोडून किंकर्तव्यमूढ झाला आहे. त्या एकाकी मनुष्याचा कोणी आश्रयदाता नाही, मदत करणारा सहाय्यक कोणी नाही, बरोबरीचा कोणी प्रवासीही नाही. स्थान अपरिचित आहे, मार्ग अज्ञात आहे, जिथे जायचे आहे ते घरदार किंवा मनुष्य दिसत नाही; असा कोणी दिसलाच तर उत्साह तरी वाढेल, म्हणून शोधत शोधत तो फिरतो, क्लांत होतो. आता चालण्याचीही शक्ती राहिलेली नाही, रात्रीचा अंधार आणि त्यात हिंस्र पशूंच्या आक्रमणाचे भय. शरीरही भुकेने शिथिल होत चाललेले, अशी त्याची अवस्था झाली आहे.

हे कष्ट स्थूल देह आणि स्थूल जगतापासून प्राप्त झालेले. याबरोबरच सूक्ष्म स्तरावर मानसिक आणि अन्य अशांती आहेच. अशा अवस्थेत हा मनुष्य सापडला आहे.

या अशा घोर विपत्तीत, जेव्हा त्याला मृत्यूच्या विक्राळ दाढा समोर दिसत आहेत, अशा वेळी त्याला एखाद्याने येऊन सांगितले की, 'निराश होऊ नकोस, पाहा, समोर छोटा दिवा जळत आहे. तिथे जा, तुझे सर्व अभाव, सर्व वंचना दूर होणार आहेत. तिथे तुझा जिवलग सखा आहे, जो तुला योग्य स्थळी घेऊन जाईल. तेव्हा आता तू घाबरू नकोस, मी तुझ्याबरोबर आहे.' तर असे आश्वासन ऐकून त्याला एकदम हायसे वाटेल. तसे हे स्तोत्र घोर कष्टामध्ये आपल्याला आधार देते. या स्तोत्रपठणाने जीवनात रस्ता चुकलेल्या लोकांना मार्ग सापडतो, अनाथाला आश्रय मिळतो, भुकेल्याला अन्न मिळते आणि भयग्रस्ताला त्राता मिळतो.

मनुष्य कितीही नास्तिक किंवा संशयी असेना का, त्याला अशा अवस्थेत नतमस्तक होऊन स्वीकारावेच लागेल की, त्याच्या ताकदीबाहेरील कोणती तरी एक शक्ती अस्तित्वात आहे, जी घोर विपत्तीत परममित्राप्रमाणे त्याच्या मदतीला धावून आली आणि तिने त्याचे रक्षण केले. वस्तुत: ही सगळी सद्‌गुरुतत्त्वाचीच रूपे असतात. मग या शक्तीला ईश्वर म्हणा किंवा सद्‌गुरु म्हणा किंवा दत्त म्हणा.

**जीवनातील कष्टावस्था व तिचा निरास–** भौतिक जीवनातही आपली अवस्था अशीच झालेली आहे. प्रत्येकजण या संसारचक्रात फिरत असतो. फिरता फिरता, नाना भोग आणि अज्ञानामुळे कित्येक मळांची साठवण

करतो. या भवसागरात मोह मायारूपी अनेक हिंस्र श्वापदे आहेत. आजचे समाजजीवन पाहिले तर ते सुद्धा इतके वाईट झाले आहे की कोण, कोणाला, कशात आणि कशासाठी अडकवेल ते सांगता येत नाही. असो. तर या बाधांमुळे आणि प्रतिकूल घटनांमुळे मनोरथ सिद्धी होत नाही, तेव्हा मनुष्याला स्वशक्तीची मर्यादा समजून येते, पण तरीही त्याच्या आकांक्षांची मात्रा वाढत राहते आणि शेवटी अशी अवस्था उत्पन्न होते, त्याला समजून येते की, या आकांक्षांची पूर्ती जगातल्या कोणत्याही वस्तुमात्राद्वारे होऊ शकत नाही.

जेव्हा दीर्घ काळ अशा अपूर्तीचा अनुभव येतो, तेव्हा जीव स्वत:ला असहाय्य समजू लागतो. मनुष्याच्या जीवनात या निराश्रय भावाचा उदय हा एक शुभमुहूर्तच म्हणावा लागतो. कारण याच वेळी त्याची दृष्टी दृश्य जगतापासून दूर जाऊन त्या जगताच्याही पलीकडे असलेल्या अज्ञात, अचिंत्य शक्तीकडे जाते. परंतु प्रत्यक्षात असे कित्येक आर्त भक्त असतात की, जे घोर संकटातही ईश्वरावर पूर्ण विश्वास ठेवू शकत नाहीत. तात्पर्य हेच की, 'बहुत सुकृतांची जोडी, म्हणूनी विठ्ठल आवडी'. म्हणूनच स्वामी महाराजांसारखे कनवाळू सत्पुरुष, प्रापंचिकांच्या मदतीला वेळोवेळी धावून जात असतात.

जोपर्यंत मनुष्याचा अहंभाव या ना त्या कारणामुळे पुष्ट होत राहतो, तोपर्यंत तो स्वत:ला एखाद्या विराट सत्तेचा आश्रित आहे असे समजणे अशक्य असते. प्रपंचाच्या घात-प्रतिघाताने हा अहंकार क्रमश: भग्न होत जातो आणि जगाची असारता त्याच्या लक्षात येते. तेव्हा दृश्य जगाच्याही पलीकडे असलेल्या ईश्वरी तत्त्वाबाबत असलेला त्याचा भाव स्वयमेव प्रकट होतो. जेव्हा खरंच अशी अवस्था होईल की, या अंधाऱ्या रात्री प्रज्वलित झालेला दीप मला कोठे दिसेल अशी ओढ निर्माण होईल, तेव्हा या स्तोत्राचे पठण करावे, मार्ग मिळायला सुरुवात होईल. एकत्रतेची शक्ती फार विलक्षण आहे. या स्तोत्ररूपी मंत्राच्या पठणातून ही शक्ती अधिक क्षमतेने निश्चितपणे ग्रहण करता येते.

सद्‌गुरूंच्या सान्निध्यात, त्यांच्या आज्ञेने घेतलेल्या नामाचा अथवा मंत्राचा प्रचंड गुणाकार होतो. परंतु प्रत्येक मंत्र म्हणताना आपले इच्छित फक्त आठवायला लागले तर इच्छित साध्य होण्यासाठी काळ जास्त लागेल, एवढंच. एखाद्या मंत्राचे पठण करून कोणाला तीन महिन्यात गुण येईल, तर कोणाला अधिक काळ लागेल. व्यक्तिमानपरत्वे हा कालावधी भिन्न असू शकतो. आपल्या नेहमीच्या जीवनातही एखाद्या औषधाचा गुण एकाला लवकर येताना तर दुसऱ्याला उशीरा येताना आपण पाहतोच. केवळ डॉक्टरवरील विश्वासानेच रोगी बरा झाल्याचीही उदाहरणे आहेत. थोडक्यात, सद्‌गुरूंच्या आज्ञेने आणि त्यांच्यावरील दृढ विश्वासाने अगदी अंत:करणापासून हे स्तोत्र म्हटले तर म्हणणाऱ्या भक्ताचे 'मंगल' झाल्यावाचून राहणार नाही. इतकेच नव्हे तर या स्तोत्राच्या फलश्रुतीत सांगितल्याप्रमाणे 'स श्रीदत्तप्रियो भवेत्।' म्हणजेच त्याला भगवान श्रीदत्तात्रेयांचे प्रेमही प्राप्त होईल.

हा लेख श्री. वासुदेव वामन बापट गुरुजी यांच्या (अ) घोरकष्टोद्धारण स्तोत्र : संपूर्ण अर्थ आणि विवेचन या पुस्तकाच्या प्रस्तावनेच्या आधारे संकलित करण्यात आला आहे. प्रकाशक : ओम सद्‌गुरु प्रतिष्ठान, मुंबई

---

पान ४४ वरून... अध्यात्म रामायण

सुध्दा पुत्रप्राप्ती होईल. अत्यंत दुराचारी आणि निंद्य कर्मे करणाराही हृदयस्थित रामाचे भक्तिपूर्वक स्मरण करेल व त्यांचे ध्यान करून या स्तोत्राचे पठण करेल, तो सुध्दा मुक्त होईल. भगवान श्रीकृष्णांनी सुध्दा गीतेत अर्जुनाला अशीच ग्वाही दिली होती.

अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्य भाक् ।
साधुरेव स मन्तव्य: सम्यग्व्यवसितो हि स: ॥
क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति ।
कौन्तेय प्रति जानीहि न मे भक्त: प्रणश्यति ॥

अत्यंत दुराचारी मनुष्य सुद्धा जर अनन्यभावाने परमेश्वराची उपासना करेल तर तो सद्वर्तनीच समजावा. कारण त्याने सन्मार्ग धरलेला आहे. त्यामुळे तो धर्मात्मा होऊन अक्षय्य सुख प्राप्त करेल व कधीही अधोगतीला जाणार नाही, असा श्रीकृष्णांच्या बोलण्याचा भावार्थ आहे.

पतित अहल्येचा सुद्धा भगवंतांनी उद्धार केला आहे. भगवंतांचा अवतारच पतितोद्धारासाठी होतो. अर्थात आपल्या पापाची जाणीव होऊन मनुष्य जेव्हा पश्चात्तापदग्ध होऊन भगवंतांना शरण जातो त्यावेळी त्या पश्चात्तापाच्या अश्रूंनी त्याचे पाप नाहीसे होते व तो भक्तीच्या मार्गात अग्रेसर होतो. भक्तीच्या मार्गावर त्याने एक पाऊल पुढे टाकले की भगवान दोन पावले टाकून जवळ येतात ही गोष्ट अहल्येच्या चरित्रावरून वेदव्यासांनी स्पष्ट केली आहे.